बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष २ ■ अंक ३१ ■ सोमवार ५ जानेवारी ते रविवार ११ जानेवारी २०२६ ■ किंमत २ रू ■ पाने ४
Beed (Maharashtra) ■ Year 2 ■ Issue -30 ■ Monday 05 January to Sunday 11 January 2026 ■ Price 2 ■ Pages 4

# 'बिनविरोध'च्या तक्रारीत तथ्य आढळल्यास नव्याने निवडणूक

साप्ताहिक दिव्य
# वास्तव
टिसी-एमए एच आर ५२६७८
संपादक - सचिन पवार

पै.सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ७२ रक्तदात्यांनी केले रक्तदान! पान ३
पान ४ माँसाहेब जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याची जोरदार तयारी



# 'बिनविरोध' वर गंडांतर; चेंडू आता हायकोर्टात

## 'स्वतंत्र व निष्पक्ष'च्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचा दावा करीत मनसेची याचिका



## न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशीची मागणी, आयोगाच्या तटस्थतेवरही प्रश्नचिन्ह

मुंबई : वृत्तांत

प्रतिस्पर्धी उमेदवारांना धमकावून आणि त्यांच्यावर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडले जात आहे. त्यामुळे पालिका निवडणुकीत सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांची बिनविरोध निवड होत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाण्याचे नेते अविनाश जाधव यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. ६८ हून अधिक जागांवर भाजपच्या उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. त्या जागांचे निकाल जाहीर करण्यास स्थगिती द्यावी. तसेच याचिकेवर अंतिम निर्णय घेईपर्यंत निकाल जाहीर करू नयेत, अशी मागणीही अविनाश जाधव यांनी केली आहे. ॲड. असीम सरोदे यांच्या माध्यमातून ही याचिका दाखल करण्यात आली आहे. 'उमेदवारांनी घेतलेली माघार स्वेच्छेने नव्हती, तर ती संघटित दबाव, धमक्या किंवा आमिषांचा परिणाम होती. यामुळे संविधानातील कलम २४३-झेडए अंतर्गत असलेल्या 'स्वतंत्र आणि निष्पक्ष' निवडणुकीच्या आदेशाचे उल्लंघन झाले आहे, असा दावा याचिकेत केला आहे.

### 'नोटा'चा उपयोग नाही

बिनविरोध उमेदवार निवडून आले आहेत तिथे प्रत्यक्ष मतदान घ्यावे व मतदारांना नोटा पयार्याची संधी द्यावी अशी मागणी होत आहे. परंतु, नियमानुसार जिथे एकच उमेदवार असेल तिथे निवडणूक घेता येत नाही. न्यायालयाकडून आदेश आले तरी त्याची अंमलबजावणी या निवडणुकीत होणार नाही, असे सूत्रांनी सांगितले.




### मनसे आयोगाच्या भेटीला

१ ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीची चौकशी करावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत निकाल जाहीर करू नये, अशी मागणी मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी सोमवारी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना भेटून केली.

२ या भेटीनंतर आयोगाने महापालिका आयुक्तांकडून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्याचे जाधव म्हणाले. जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सोमवारी वाघमारे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी काही पुरावे सादर केले.

**'बिनविरोध'च्या तक्रारीत तथ्य आढळल्यास नव्याने निवडणूक** : महापालिका निवडणुकीत जवळपास ६८ उमेदवार 'बिनविरोध' निवडून आल्याची गंभीर दखल राज्य निवडणूक आयोगाने घेतली असून, 'बिनविरोध' प्रकरणातील तक्रारीत तथ्य आढळल्यास त्या प्रभागाची निवडणूक रद्द करून तिथे नव्याने निवडणूक प्रक्रिया राबवली जाईल, असे राज्य निवडणूक आयोगातील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. जिथे बिनविरोध निवडणूक झाली आहे, तिथे संबंधित महापालिका आयुक्तांना स्वतंत्र चौकशी करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत.

**६९ प्रकरणांची चौकशी** : राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांत आतापर्यंत बिनविरोध निवडून आलेल्या अंदाजे ६९ प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. एखाद्या प्रभागातून एकमेव उमेदवार निवडणूक लढवत असेल आणि त्या परिस्थितीत मोठ्या संख्येने मतदारांनी 'नोटा' (वरीलपैकी कोणीही नाही) हा पर्याय निवडला तर अशावेळी निकाल काय असेल, हे स्पष्ट करावे, अशी विनंती जाधव यांनी याचिकेत केली.

# अल्पवयीन मुलांना गाडी चालवण्यास दिल्यास पालकांवर कारवाई!

## पोलीस अधिक्षकांचा इशारा ; नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पालकांना होवू शकते शिक्षा

बीड / प्रतिनिधी

जिल्ह्यातील शाळा आणि खासगी शिकवणी वगार्साठी जाणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या हातात पालकांनी वाहने दिल्यास आता थेट पालकांवरच गुन्हे दाखल होणार आहेत. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी या संदर्भात आदेश जारी केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पालकांना ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा भोगावी लागू शकते. वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी आणि अल्पवयीन मुलांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी १८ वर्षांखालील मुले परवाना नसतानाही दुचाकी किंवा चारचाकी वाहने चालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणांमध्ये केवळ मुलांवरच नाही, तर त्यांच्या पालकांवर 'भारतीय न्याय संहिता', 'मोटर वाहन कायदा' आणि 'जेजे ॲक्ट'च्या विविध कलमान्वये कारवाई केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने २५ हजार रुपयांचा दंड आणि ३ वर्षांपर्यंतच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे. या कारवाईचे परिणाम केवळ दंडापर्यंत मर्यादित नसून, संबंधित मुलांच्या भविष्यावरही याचा मोठा परिणाम होणार आहे. जर एखाद्या अल्पवयीन मुलावर वाहतूक नियमांच्या उल्लंघनाचा गुन्हा दाखल झाला, तर त्याला वयाच्या २५ वर्षांपर्यंत वाहन परवाना मिळणार नाही. तसेच भविष्यात नोकरी, पासपोर्ट किंवा चारित्र्य प्रमाणपत्र मिळवताना अडचणी पान २ वर



अल्पवयीन मुलांना दैनंदिन कामांसाठी वाहन चालविण्यास देणे हे संपूर्णपणे बेजबाबदारपणाची व बेकायदेशीर असून अल्पवयीन मुलांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास पालकांना दोषी धरले जाईल. त्यामुळे पालकांनी मुलांना सायकल किंवा ई-सायकल हे सुरक्षित पर्याय निवडावेत. - **नवनीत कॉवत, जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड.**

# निमगाव मायंबा येथे भरदिवसा घरफोडी

## दागिन्यांसह रोख रक्कम लंपास

बीड / प्रतिनिधी

चकलांबा (ता. गेवराई) पोलीस ठाणे हद्दीतील निमगाव मायंबा येथे भरदिवसा चोरट्यांनी घरफोडी करत घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. ही घटना २ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ३.१५ वाजेच्या सुमारास घडली.

याप्रकरणी आबासाहेब विठ्ठल घुंगरड (रा. निमगाव मायंबा ता. शिरूर) यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात शनिवारी फिर्याद नोंदवली. त्यानुसार घुंगरड व त्यांचे कुटूंबिय हे मुळे, २ जानेवारी रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घराला कुलूप लावून शेतात काम करण्यासाठी गेले होते. घर कुलूप बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी घुंगरड यांच्या घराचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश केला कपाटातचे दार तोडून त्यातील ६० हजार रुपयांच्या रोख रकमेसह सोन्याची १० ग्रॅमची पोत, आबासाहेब कर्णफुले आणि दादासाहेब विठ्ठल घुंगरड यांच्या कपाटातील ९० हजारांची रक्कम असा एकूण एक लाख ६५ हजार घुंगरड हे सायंकाळी घरी परतल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणी त्यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात दिलेल्या फियार्दीनुसार अज्ञाताविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

# आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा अंमळनेर ग्रामस्थांतर्फे गुणगौरव सोहळा संपन्न



अंमळनेर / प्रतिनिधी

रविवार दिं. 4 जानेवारी 2026 रोजी श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर, संजीवनी हरिपाठ सभागृह येथे बीड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री बाळासाहेब मिसाळ सर, श्री सलीम तांबोळी सर, श्री राहुल डोंगर सर यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल समस्त अंमळनेर ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणे म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य आणि मूल्य रुजवून त्यांना भारताचे सुजाण नागरिक बनवणे, शिक्षणातून त्यांच्या क्षमतांचा विकास करणे आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी त्यांना तयार करण्याचे काम शिक्षकच करत असतात. हे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असतांना कुठेतरी शिक्षकांच्या कायार्चा आणि कर्तुत्वाचा गौरव होणे आवश्यक आहे. आज आपण समस्त अंमळनेर ग्रामस्थांच्या वतीने राष्ट्र निर्मितीला हातभार लावून विद्यार्थ्यांचे एक उज्वल भविष्य घडविणाऱ्या शिक्षकांचा आणि त्यांच्या कायार्चा गौरव करत आहोत, यात निश्चितच आनंद आहे, असे कार्यक्रमाचे आयोजक श्री. प्रा. मनोज पवार सर यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री बाळासाहेब मिसाळ सर, श्री सलीम तांबोळी सर, श्री राहुल डोंगर सर यांनी शिक्षण क्षेत्रात काम करत असतांना विद्यार्थ्यांचे जीवन सुजलाम, सुफलाम बनवण्याचे पवित्र कार्य करत असतांना आनंद होत असतो, अशी भावना आपल्या मनोगतातून व्यक्त केली. या कार्यक्रमाप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन अमळनेरचे श्री कृष्णाजी चव्हाण साहेब तसेच युवा नेते श्री सुग्रीव काका पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा सर्व ग्रामस्थांतर्फे देण्यात आल्या. या कार्यक्रमाप्रसंगी अंमळनेरचे मा. सरपंच श्री मुरलीधर पवार, अमळनेर चे मा. सरपंच श्री उद्धवशेठ पवार, युवा नेते श्री पिनुशेठ पोकळे, पिंपळवंडी चे मा. सरपंच श्री ज्ञानेश्वर पवार, पान २ वर

लोकार्पण...

## संत वामनभाऊंच्या मंदिरावर सुवर्ण कलशारोहण होणार

# संत वामनभाऊ पुण्यतिथी सोहळ्याला 21 एकरांत कीर्तन मंडप, 1 हजार क्विंटलची बुंदी!

कुचळंब / प्रतिनिधी

पाटोदा, कुसळंब तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गह येथे संत वामनभाऊ महाराजांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यास शनिवारपासून सुरुवात झाली असून, येथे २१ एकरांत कीर्तन मंडप उभारण्यात आला आहे. १० जानेवारी रोजी पुण्यतिथी सांगता सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित राहणार आहेत. राज्यभरातून जवळपास ८ लाख भाविक येणार असल्याची माहिती संस्थानकडून देण्यात आली.

संत वामनभाऊ यांचा जन्म १८९१ मध्ये झाला, तर देहावसान २४ जानेवारी १९७६ ला झाले. यंदा संत वामनभाऊ यांचा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळा होत आहे. शनिवारी सकाळी चैतन्य श्री गहिनीनाथ महाराज यांच्या संजीवन समाधीस त्याचबरोबर संत वामनभाऊ यांच्या समाधीला गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या हस्ते पंचामृत अभिषेक, पूजा, होमहवन करण्यात आले. सप्ताह काळात वामनभाऊंची चरित्र कथा, ५१ कुंडी महाविष्णू याग व नवनाथ ग्रंथ पारायण, कीर्तन महोत्सव, यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता संत वामनभाऊ महाराज यांच्या मंदिराच्या शिखरावर सुवर्ण कलशारोहण होणार असून, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील विकासकामांमधून ४०० बाय ३०० या बांधण्यात आलेल्या अद्ययावत महासभागृहाचे लोकार्पण होणार आहे.

### पंतप्रधान मोदींना निमंत्रण, मुख्यमंत्री फडणवीस येणार

गहीनीनाथ गडाच्या वतीने येत्या १० जानेवारी रोजी पुण्यतिथीच्या सांगता सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रण देण्यात आले आहे. त्यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, अमृता फडणवीस, आमदार उपस्थित राहणार असल्याचे गहिनीनाथ गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी सांगितले.




### राज्यभरातून आठ लाख भाविक येण्याचा अंदाज, ७०० क्विंटल मुरमुऱ्याचा चिवडा तयार

गहिनीनाथ गडावर कीर्तनासाठी २१ एकरमध्ये, तर भोजनासाठी पाच एकरमध्ये, यज्ञासाठी एक एकरात मंडप उभारला आहे. पुण्यतिथी सोहळ्यासाठी राज्यभरातून आठ लाख भाविक येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. येणाऱ्या भाविकांसाठी प्रसाद म्हणून १ हजार क्विंटल बुंदी आणि ७०० क्विंटल मुरमुऱ्याचा चिवडा तयार करण्यात आला आहे.

# हुतात्मा देवराव विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



पाटोदा / प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील भायाळा येथील हुतात्मा देवराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री. राम वणवे सर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. पाटील सर यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकायार्चा थोडक्यात आढावा घेतला. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक श्री. नागरगोजे सर, श्री. बागडे सर व श्री. मुळे सर यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीबाईंनी सोसलेले कष्ट आणि त्यांनी समाजासाठी दिलेल्या शैक्षणिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. या सोहळ्यात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी भाषणे सादर केली. यामध्ये अजिंक्य बांगर, अंजली बांगर, श्रेया बांगर, स्वाती बांगर, आरती बांगर, आदित्य बांगर, पंकजा बांगर, संकल्प गायकवाड, आदित्य मिसाळ, शुभम बांगर, शुभांगी बांगर, आदेश सोनवणे, मंथन बांगर, हर्षदा गायकवाड आणि ज्ञानेश्वर मुंडे या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या पान २ वर

## कॉपीमुक्त अभियानाचा मराठवाड्यासह विदर्भातही फज्जा

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षा महत्त्वाच्या ठरतात. आयुष्यामध्ये काय बनायचे याचा निर्णय बऱ्याच अंशी या दोन्ही निकालांवर विद्यार्थी व पालक घेत असतात. दहावी, बारावीच्या परीक्षा बोर्डाच्या असल्याने या परीक्षांसाठी सरकारकडून, शिक्षण बोर्डाकडून विशेष खबरदारी घेण्यात येत असते. दरवर्षी दहावी, बारावीच्या परीक्षांचे पेपर फुटणे, कॉपीच्या घटनांमध्ये वाढ होणे अशा घटना वाढत असल्याने या परीक्षांबाबत जनसामान्यांमध्येदेखील उलटसुलट चर्चा होत असते. या घटनांची न्यायालयानेदेखील दखल घेऊन या परीक्षांच्या तयारीबाबत, आयोजनाबाबत, सुरक्षेबाबत ताशेरे ओढत राज्य सरकारांना, शिक्षण मंडळांवर ताशेरे ओढले होते. यावर्षी दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडल्या जाव्यात, यासाठी राज्य सरकारकडून तसेच शिक्षण मंडळांकडून जय्यत तयारी करण्यात आली होती. कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच कॉपीला खतपाणी घालणाऱ्या परीक्षा केंद्रावर कडक कारवाई करणार असल्याचे प्रशासनाकडून जाहीरही करण्यात आले. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्यासाठी शालेय आवारात, वर्गांच्या बाहेर ड्रोनने टेहाळणी करण्याचा प्रयोगही या वर्षीपासून राबविण्यास सुरुवात झाली आहे. सध्या बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. दहावीच्या सीबीएसई, आयसीएसईच्या परीक्षाही सुरू झालेल्या आहेत. शुक्रवारपासून महाराष्ट्र राज्य शालांत बोर्डाच्या परीक्षांनाही सुरुवात झाली. बारावीच्या परीक्षेत अनेक ठिकाणी कॉपी करताना विद्यार्थी पकडले गेले. सीबीएसई, आयसीएसईच्या दहावीच्या परीक्षेसाठी शाळेत प्रवेश करताना शाळेच्या सुरक्षा व्यवस्थेकडून ज्या प्रकारे काटेकोरपणे विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली होती, ते पाहिल्यावर दहावीच्या परीक्षेमध्ये कॉपी होणार नाही, कॉपीमुक्त अभियान यशस्वी होईल आणि परीक्षा पद्धतीला लागलेला कॉपीनामक कलंक कायमचाच संपुष्टात येईल, असा आशावादही समाजातील विविध घटकांकडून व्यक्त करण्यात येत होता; परंतु कॉपीमुक्त अभियान चांगले असले व त्यादृष्टीने प्रशासनाकडून तयारीदेखील जय्यत असली तरी पहिल्याच टप्प्यात शंभर टक्के यश मिळणे शक्यच नव्हते; परंतु कोठेतरी गंभीरपणे प्रयत्नांना सुरुवात होणे आवश्यक होते. महाराष्ट्र राज्याच्या सुरू झालेल्या शालान्त मंडळाच्या दहावीच्या पहिल्याच मराठीच्या पेपर कॉपीमुक्त अभियानाचे अक्षरशः धिंधवडे निघाले आहेत. मराठीच्या पहिलाच पेपरमध्ये कॉपी करण्याच्या घटना तर घडल्याच, पण काही ठिकाणी झेरॉक्स सेंटरवर अवघ्या काही रुपयांमध्ये मराठीच्या प्रश्नपत्रिका विकल्या गेल्याचा प्रकार महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात घडला आहे. जालन्यामध्ये कॉपीमुक्त अभियानाचा पूर्णपणे फज्जा उडाला आहे. जालन्यातल्या बदनापूरमध्ये दहावीची प्रश्नपत्रिका फुटली आहे. लोकांनी त्याची झेरॉक्स काढून विद्यार्थ्यांना उत्तरे पुरवली आहेत. बदनापूर येथील परीक्षेच्या ठिकाणाचा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. दहावीच्या बोर्डाची परीक्षा सुरू झाल्यानंतर पहिल्या १५ मिनिटांत मराठीचा पेपर फुटला. शहरातील झेरॉक्स सेंटरवर अवघ्या २० रुपयांत प्रश्नपत्रिकेची झेरॉक्स मिळत होती. जालन्यामध्ये पेपर फुटल्यानंतर राज्य सरकारच्या कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडाला आहे. बदनापूर बोर्डातून दहावाची प्रश्नपत्रिका बाहेर आलीच कशी? अशी चर्चा राज्यामध्ये सुरू झाली आहे.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त आणि निकोप वातावरणामध्ये पार पडण्यासाठी राज्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी परीक्षा केंद्रावरील बैठ्या पथकाने आवश्यक खबरदारी घ्यावी. ज्या परीक्षा केंद्रावर कॉपीचे प्रकार आढळून येतील तेथे कॉपी करणारा विद्यार्थी, त्याचे पालक, पर्यवेक्षक आणि केंद्र प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल. परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात कुणीही येणार नाही, परीक्षा केंद्र परिसरातील झेरॉक्स दुकाने परीक्षा कालावधीत सुरू राहणार नाहीत. याची काळजी परीक्षा केंद्रावर बंदोबस्तास असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांनी घ्यावी, परीक्षा केंद्रावर कुणाचा हस्तक्षेप आढळल्यास त्वरित नियंत्रण कक्षास माहिती देण्याच्या सूचनाही तेथील कर्मचाऱ्यांना दिल्या होत्या. दहावी, बारावीच्या परीक्षेत आढळणाऱ्या सामूहिक कॉपी प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आधीच गंभीर दखल घेतली आहे. परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडणे ही जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संयुक्त जबाबदारी राहील, असे सांगतानाच ज्या केंद्रावर कॉपीचे प्रकार उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता रद्द करा. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपीसाठी मदत करतील त्यांना थेट बडतर्फ करा, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी या आधी दिले होते; परंतु पहिल्याच पेपरला अशी घटना घडल्याने कॉपीमुक्त अभियानाचे काय झाले? इतके दिवस केलेल्या तयारीवर अवघ्या काही मिनिटांतच पाणी कसे पडले? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती जनसामान्यांकडून समाजमाध्यमांवर करण्यात येत आहे. जालन्यात अन्य ठिकाणी परीक्षा केंद्रावर हुल्लडबाजीचा प्रकार कॉपी पुरवण्यासाठी करण्यात आल्याची घटनाही घडली आहे. जालन्यातील मंठा तालुक्यातील तळणी येथे विद्यार्थ्यांना कॉपी पुरवण्यासाठी गर्दी, परीक्षा केंद्राबाहेर तरुणांची हुल्लडबाजी व्हीडिओत कैद झाली आहे. परीक्षार्थींना बाहेरील गोंधळाचा परीक्षेदरम्यान त्रास सहन करावा लागला. मुळात वर्षभर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना कॉपीचा आधार का घ्यावा लागत आहे? हीच खरी शोकांतिका आहे. विद्यार्थ्यांनी कॉपी करणे हा पालकांनी तसेच शिक्षकांनी घडविलेल्या संस्काराचा अपमान आहे. कॉपीसाठी जीवघेणे नियोजन करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येणार नाही. कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडाला असला तरी प्रशासनाने तयारीत सातत्य ठेवावे. यावर्षी आलेल्या मर्यादा, अपयश, त्रुटी यावर तोडगा काढून कदाचित पुढच्या वर्षी या अभियानाला नक्कीच शंभर टक्के यश मिळेल, असा आशावाद बाळगण्यास हरकत नाही.

# मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया रचणारे दर्पण



प्रा.सचिन पवार
मो.9921801919

संसद, न्यायसंस्था व कार्यकारी सत्तेनंतर आपल्या लोकशाहीप्रधान देशाचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखल्या जाणा-या वृत्तपत्रांचा भारतात उगम झाला तो 1780 मध्ये. जेम्स ऑगस्टस हिकी यांनी बेंगॉल गॅझेट या नावाने वृत्तपत्र सुरू करून भारतीय वृत्तपत्रसृष्टीचे जनकत्व पत्करले, तर मराठी वृत्तपत्रसृष्टीचा उगम होण्यास त्यानंतर तब्बल 48 वर्षांचा कालखंड लागला आणि 1832 मध्ये मराठी वृत्तपत्राचा जन्म झाला. 6 जानेवारी 1832 या दिवशी बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या नावाने पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करून मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया रचला. म्हणूनच जांभेकरांना मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक म्हटले जाते. व्यासंगी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या जांभेकरांच्या जीवनक्रमाचा इतिहास म्हणजे दैदिप्यमान कारकीर्दीचा सोनेरी प्रकाशच होय. 1812 ते 1832 या कालावधीत त्यांनी आपल्या कर्तृत्वाची झलक विद्वान प्राध्यापक, ग्रंथकार व संपादक अशा विविध पैलूंनी दाखवून समाजातील अज्ञानरूपी अंधकार वृत्तपत्राच्या माध्यमातून दूर करण्याचा प्रयत्न केला.

कोकणातील देवगड तालुक्यात असलेल्या पोंभुर्ले या गावी 1812 मध्ये जांभेकरांचा जन्म झाला. अवघ्या विसाव्या वर्षी, म्हणजेच 1832 मध्ये त्यांनी दर्पण या नावाने मराठी भाषेत वृत्तपत्र सुरू केले. दर्पण हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू झाले 6 जानेवारी 1832 रोजी ते प्रथम पाक्षिक म्हणून. 4 मे 1832 पासून मराठी, इंग्रजी अशा दोन्ही भाषांत हे वृत्तपत्र प्रकाशित केले जाई. दर्पण म्हणजे आरसा. सद्य:स्थितीचे खरेखुरे दर्शन वृत्तपत्राच्या माध्यमातून घडवून झोपलेल्या समाजाला जागे करणे हाच या नावामागील बाळशास्त्रींचा हेतू होता. यामुळेच ह्यदर्पणह्णमधून मुलकी व न्याय खात्यातील अधिका-यांची माहिती, तसेच वैज्ञानिक घडामोडी, स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह आदी सामाजिक प्रश्नांवर जहाल लिखाण झाल्याचे आढळते. प्रामुख्याने विधवा पुनर्विवाहाची चळवळच त्यांच्या लिखाणामुळे उभी राहिली. ज्ञानाचा प्रसार समाजाच्या तळागाळापर्यंत झाला पाहिजे आणि हे कार्य दर्पणच्या माध्यमातून केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले होते. 1840 मध्ये त्यांनी दिग्दर्शन हे पहिले मराठी मासिक सुरू केले. त्यांनी बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीचीही स्थापना केली. शिवाय नेटिव्ह इम्प्रुव्हमेंट सोसायटीदेखील स्थापन केली. या सोसायटीतूनच पुढे स्टुडंट लायब्ररी अँड सायंटिफिक सोसायटीचा जन्म झाला. दादाभाई नौरोजी आणि भाऊ दाजी लाड यांच्यासारख्या नेत्यांनी याच संस्थांपासून प्रेरणा घेतली. इंग्रज राजवटीतील गव्हर्नर सर जेम्स कर्नाक यांनी बाळशास्त्रींना जस्टिस ऑफ द पीस अशी पदवी दिली, हेच दर्पणचे यश मानले जाते. दर्पणमध्ये वाचकांना महत्त्वाचे स्थान दिले जात होते. वाचकांना मुक्तपणे मनोगत मांडता यावे, यासाठी विशेष प्राधान्य दिले जात असे. विशेष म्हणजे स्तुती करणारी पत्रे यात कधीच छापली जात नव्हती. त्या काळची परिस्थिती, एकूण साक्षरतेचे अत्यल्प प्रमाण व वृत्तपत्रासारख्या नवीन उपक्रमाला पैसे खर्च करून वाचणारे तर अगदीच कमी, तरीही त्या काळी ह्यदर्पणह्ण समाजातील लोकांना आपलेसे वाटत होते. त्याचा खप चांगला होता.

आर्थिक पाठबळ नसल्यामुळे एखादे वृत्तपत्र बंद पडण्याची प्रथा मराठीतील या पहिल्याच वृत्तपत्रापासून पडली. दर्पण आठ वर्षे चालले. 26 जून 1840 रोजी शेवटचा अंक प्रसिद्ध झाला आणि नंतर ते बंद झाले. लोकशिक्षण व समाज प्रबोधन या उद्देशाने सुरू केलेल्या दर्पणचे कार्य उल्लेखनीय असून आधुनिक वृत्तपत्रसृष्टीला आदर्श ठरावे असेच आहे. बाळशास्त्री जांभेकर हे थोर पत्रकारमहर्षी अल्पायुषी ठरले, पण त्यांनी आपल्या जीवनातील प्रत्येक दिवस समाजकायासाठीच खर्ची घातला. 17 मे 1846 रोजी त्यांचे निधन झाले आणि 35 वर्षांच्या अल्पशा कारकीर्दीला पूर्णविराम मिळाला. म्हणूनच 6 जानेवारी हा दिवस मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचा समजला जातो, पत्रकार दिन म्हणून पाळण्यात येतो. यानिमित्ताने आज सर्व पत्रकार बांधवांना पत्रकार दिनाच्या खूप खूप शुभेच्छा...

### मराठी वृत्तपत्राचा पाया उभारणारे जांभेकर

बाळशास्त्रींची पत्रकारिता समाज प्रबोधन व लोकशिक्षणाचे ज्ञान देणारे एक विद्यापीठ होते. आधुनिक युगात माहिती तंत्रज्ञान विकसित झाले, कालांतराने पत्रकारिता क्षेत्रात मोठे बदल झाले. टी.व्ही. मीडियाच्या काळात वृत्तपत्रांना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी विविध पैलूंचा वेध घ्यावा लागत आहे. देशाला आज भ्रष्टाचार, लोकसंख्या वाढ, बेरोजगारी, महागाई अशा विविध गंभीर समस्यांनी ग्रासलेले असताना एक वैभवसंपन्न, बलशाली भारत निर्माण करण्याचे मोठे आव्हान पत्रकारिता क्षेत्रापुढे उभे आहे. आधुनिक पत्रकारिता कशी आहे, हा एक संशोधनाचा विषय ठरेल. तथापि ह्यदर्पणह्ण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू करणा-या बाळशास्त्री जांभेकरांना आधुनिक युगात मोठ्या अभिमानाने ह्यदर्पणह्णकार ही पदवी बहाल करण्यात आली आहे. अर्थात ह्यदर्पणह्णपूर्वीही काही अनियतकालिके मराठीतून प्रसिद्ध झाल्याचे मानले जाते, परंतु अधिकृत नोंद असलेले ह्यदर्पणह्ण हेच पहिले मराठी पत्र मानले जाते. त्याच्या प्रतींच्या प्रतिकृती आजही उपलब्ध आहेत.



## थरारक घटना! गोळी लागली, मजूर जिवाच्या आकांताने धावला, हल्लेखोरांनी गाठून कोयत्याने तोडले

### भर दुपारी गोळीबाराच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली



**बीड/प्रतिनिधी**

शहरातील अंकुशनगर भागात नगरपालिकेच्या पाइपलाइनचे काम करणाऱ्या हर्षद तुळशीराम शिंदे (वय ३५, रा. हाऊसिंग कॉलनी, धानोरा रोड, बीड) या कंत्राटी मजुरावर गोळ्या झाडून कोयत्याने तोंडवर वार करीत निर्घृण खून करण्यात आला. ही थरारक घटना मंगळवारी दुपारी २ ते २:३० वाजेच्या सुमारास घडली. गोळीबाराच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. हा खून कोणत्या कारणावरून झाला, याची माहिती अद्याप समोर आली नाही. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे. हर्षद शिंदे सध्या बीड नगरपालिका येथे कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बीड शहरापासून हद्दवाढ झालेल्या अंकुशनगर भागातील साई-पंढरी लॉन्स व मंगल कार्यालयाच्या समोर मंगळवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास पाइपलाइन दुरुस्तीसाठी खड्डा खोदण्यात आला होता. हा खड्डा हर्षद शिंदे व त्याचा एक अन्य सहकारी खोदून पाइपलाइनचे काम करत असताना त्या ठिकाणी विशाल संजय सूर्यवंशी दुचाकीवरून आला. त्याने बंदुकीमधून तीन गोळ्या झाडल्या. दोन गोळ्या चुकविल्या. मात्र, एक गोळी बरगडीत लागल्याने जीव वाचविण्यासाठी हर्दष जवळच असलेल्या एका रिकाम्या प्लॉटमधील शेडच्या पाठीमागे लपला असता विशाल त्याचा पाठलाग करत त्या ठिकाणी गेला, हर्षदच्या तोंडावर वार करून खून करून पळून गेला. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, बीड पोलिस उपअधीक्षक पूजा पवार, शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे प्रवीणकुमार बांगर यांच्यासह इतर अधिकारी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी ठाण मांडून होते. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

**पुरावे गोळा केले**

पाइपलाइनसाठी पाच फुट खोदलेल्या खड्ड्यामध्ये दोन रिकामे कार्टेज आढळून आले. फॉरेन्सिक लॅबच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळावरून गोळ्यांसह इतर महत्त्वाचे पुरावे गोळा केले. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. दरम्यान, घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

**आरोपीचा शोध सुरू**

पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत म्हणाले की, घटनास्थळावरून बंदुकीचे दोन रिकामे कार्टेज आढळून आले. आरोपी विशाल सूर्यवंशी याने झाडलेल्या गोळ्या चुकवून हर्षद शिंदे याने पळ काढला असावा आणि हर्षद याचा पाठलाग करून खून केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. हा खून कोणत्या कारणावरून झाला याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. आरोपीचा शोध पोलिस टीमने सुरू केला आहे.

## यंदाच्या जि.प.व पं.स.निवडणुका : सर्वसामान्य जनतेच्या मुक्तीचे साधन



सध्या राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून लवकरच अधिकृत वेळापत्रक जाहीर होईल, अशी माहिती सूत्रांकडून मिळते. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या निवडणुकांचे प्रमुख कारण म्हणजे प्रशासक राजवट. हा 'प्रशासक' नावाचा जुलमी अधिकारी सर्वसामान्य शेतकरी आणि ग्रामस्थांच्या पदरी काहीच पडू देत नाही, असे चित्र दिसते.

साध्या घरकुल योजनेची मंजुरी असो की विहीर खोदण्याची, अशा मूलभूत सुविधांसाठीही मोठ्या प्रमाणात पैसे घेतले जाण्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर आल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागातील जनतेला विकासापासून वंचित राहावे लागते. आता या निवडणुका सर्वसामान्यांच्या मुक्तीचे खरे साधन ठरू शकतात. मतदारांनी आपला मताधिकार स्वाभिमानाने आणि हक्काने वापरला पाहिजे. कुणाच्या भूलथापेला किंवा प्रलोभनाला बळी न पडता, मत विकले जाऊ नये. डॉ. भीमराव आंबेडकर म्हणतात, ''तुमच्या मताची किंमत मीठ-मिरची इतकी समजू नका. त्यातील सामर्थ्य ज्या दिवशी तुम्हाला कळेल, त्या दिवशी ते मत विकत घेऊ पाहणारे इतके कंगाल होतील की, कोणीही तुम्हाला पैशाने किंवा मटण-दारूने खरेदी करू शकणार नाही. हा संदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे.छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, अण्णाभाऊ साटे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाभिमान, समता, संघर्ष आणि न्यायाची शिकवण आपण आदर्श मानली पाहिजे. सुशिक्षित आणि वैचारिकदृष्ट्या जागरूक मतदार म्हणून, प्रामाणिक व योग्य उमेदवारांची निवड करणे गरजेचे आहे. तेव्हाच या जुलमी व्यवस्थेपासून खरी मुक्तता मिळेल.बंधू-भगिनींनो आणि तमाम मतदारांनो, तुम्हाला विनंती आहे की, मतदान कोणालाही करा, पण तुमचा हा मौल्यवान अधिकार पैशासाठी किंवा खाण्या-पिण्याच्या



प्रलोभनासाठी विकू नका. भारतातल्या सामान्य माणसाच्या हातातील हे सर्वात मोठे हत्यार आहे झ्र मतदानाचा अधिकार! त्याचा वापर अशा उमेदवारांसाठी करा, ज्यांच्यात समाजातील तत्त्वनिष्ठा, निष्ठा, वैचारिक स्पष्टता, साक्षरता आणि सहकार्याचे गुण आढळतील. जाती-धर्माच्या भिंती ओलांडून, पक्ष किंवा अपक्षाच्या पलीकडे जाऊन, समाजहित जोपासणाऱ्या लोकांना निवडून द्या.या निवडणुका केवळ सत्तेचा बदल नाहीत, तर ग्रामीण जनतेच्या मुक्तीचा मार्ग आहेत. मतदार जागरूक राहिले, तरच खरी लोकशाही मजबूत होईल!

**- अतुल शेलार**
**सामाजिक कार्यकर्ते कुसळंब.**

पण चार वरून

**निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रस्त्यांची डागडुजी!**

आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली. ही डागडुजी तात्पुरती असून पावसाळा आला की परिस्थिती पुन्हा जैसे थे होणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. केवळ निवडणूकपुरते नव्हे तर दीर्घकालीन, दजेर्दार व टिकाऊ रस्ते बांधकाम व्हावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.विशेष म्हणजे रस्त्याच्या कामात डांबरच न वापरता केवळ खडी टाकून काम केले जात असल्याचे निदर्शनास येताच संतप्त ग्रामस्थांनी रस्ताकाम तात्काळ बंद पाडले. यावेळी कंत्राटदाराने आपली चूक कबूल करत रस्त्यावरील खडी बाजूला काढून पुन्हा डांबर टाकून योग्य पद्धतीने काम करण्याचे आश्वासन दिल्यानंतरच ग्रामस्थांनी काम सुरू करण्यास परवानगी दिली.या वेळी सचिन घरत, गौतम घरत, कृष्णा घरत, संतोष शिंदे, पिंटू घरत, दादाहरी घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.एकंदरीतच जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या रस्ते ह्लदुरुस्तीह्वमुळे विकासापेक्षा भावी लोकप्रतिनिधींचा संधीसाधूपणाच अधिक उघड होत असल्याची चर्चा सध्या गावोगावी रंगू लागली आहे.

पण एकवरून

**अल्पवयीन मुलांना गाडी चालवण्यास दिल्यास पालकांवर कारवाई!**

निर्माण होऊ शकतात. अपघाताच्या स्थितीत विम्याचा दावाही फेटाळला जाणार असल्याने पालकांनी गंभीर दखल घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षकांनी शाळा आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांचे समुपदेशन करावे आणि हा संदेश पालकांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर पोहोचवावा. अल्पवयीन मुलांसाठी सायकल किंवा ई-सायकल हा सुरक्षित पर्याय असल्याचेही पोलिसांनी सुचवले आहे.

**आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा अंमळनेर ग्रामस्थांतर्फे गुणगौरव सोहळा संपन्न**

सरपंच श्री अशोक जेधे, सरपंच श्री महेश खेंगरे, सरपंच श्री राजेंद्र इथापे, युवा नेते श्री अर्जुन आबा पवार, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख श्री सी आर बेद्रे सर, ज्येष्ठ नागरिक श्री आबासाहेब पवार मुकादम, श्री तुकाराम पोकळे, श्री. किसनअण्णा पवार, श्री अनिल पवार, श्री. कल्याण काकडे, उद्योजक श्री सोमाशेठ पांगरे, ग्रा.पं.सदस्य राजेंद्र पोकळे, ग्रा.पं. सदस्य श्री मंगेश कदम, युवा नेते अशोक पवार, युवा नेते श्री.रमेश पोकळे, श्री.भाऊसाहेब नाना पोकळे, युवा नेते संतोष आप्पा पोकळे, श्री.पप्पुशेठ पवार, श्री.वसुदेव नवले, श्री.संभाजी पोकळे टेलर, श्री अशोक पवार दौलतवाडी, श्री. डांभे, श्री.रौफ तांबोळी, श्री भिमा पवार, श्री. आशिष ढगे, श्री.अशोक पवार पिंपळवंडी, श्री. कृष्णा पोकळे, अहमद पठाण, शौकत बागवान, श्री वामन मिसाळ,श्री.प्रशांत नागापुरे, श्री. विठ्ठल नवले, श्री हरी पवार, श्री.सुरेश पोकळे, श्री मोहन उंडे, श्री.गणेश शितोळे यांच्यासह पत्रकार,राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, कृषी, व्यापारी क्षेत्रातील मान्यवर तथा शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्यासह शिक्षण प्रेमी नागरिक व समस्त अंमळनेर ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्री प्रा.महेश हडतगुणे सर यांनी तर आभार प्रदर्शन श्री अनिलशेठ हडतगुणे यांनी केले.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात अमुलाग्र बदल घडवणाऱ्या शिक्षकांच्या या गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याबद्दल अंमळनेर आणि अंमळनेर परिसरातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिक व समस्त ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

**हुतात्मा देवराव विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी**

कार्याबद्दल आपले विचार मांडले. अध्यक्षीय भाषणातून बोलताना प्राचार्य श्री. राम वणवे सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षाचे स्मरण करून दिले आणि आजच्या युगात स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. बागडे सर यांनी केले, तर शेवटी श्री. जावळे सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पण ३ वरून

**अबॅकस स्पर्धेत आरव नरसाळे राज्यात प्रथम!**

मुख्याध्यापक येवले सर, तसेच नरसाळे सर, एस. आर. पवार सर, बी. आर. पवार सर, लटपटे सर, श्रीमती नवले मॅडम, श्रीमती होळकर मॅडम आणि कुमारी समृद्धी पटवा मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन व अथक परिश्रम कारणीभूत ठरले आहेत. शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच आरवने हे उज्ज्वल यश संपादन केले असल्याची भावना पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.या यशाबद्दल पिंपळवंडी गावचे सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, तसेच गावातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिकांनी आरव नरसाळे व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पिंपळवंडीचे अभिनंदन केले आहे. आरवचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून भविष्यात तो आणखी मोठी भरारी घेईल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला आहे.

**राहुल डोंगर सर आदर्श शिक्षक पुरस्काराने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते सन्मानित**

मा. श्री संदीप भैय्या क्षीरसागर मा. श्री विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड , मा. श्री जितीन रहमान साहेब मुख्यकार्यकारी अधिकारी बीड , डॉ किरण कुवर शिक्षणाधिकारी प्राथमिक व सर्व सन्मानीय महोदय यांच्या उपस्थितीत दिमाखदार सोहळा संपन्न..

**प्रहार शेतकरी संघटनेला नवे नेतृत्व तालूकाध्यक्ष मनोज खिंडरे, शहरध्यक्ष सोमनाथ वाघयारे यांची निवड**

या निवडीबद्दल प्रहार शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधवांनी मनोज खिंडरे, व सोमनाथ वाघमारे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.त्यावेळी शिवसेना ता. अध्यक्ष बाळू कुंरूद (शिंदे गट)प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा सरचिटणीस हनुमंत तोंडे,(उ.बा. ठा.गट) ता.अध्यक्ष बाबासाहेब सराफ प्रहारचे शहरध्यक्ष बापू सिरसठ,ता.उपाध्यक्ष विष्णू चोले ,सचिव,अशोक ईगोंले आदी प्रहारचे कर्यकर्त्ये उपस्थित होते.

**आष्टी तालुका पत्रकार संघाची कार्यकारणी जाहीर**

जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपाध्यक्ष मनोज पोकळे व शरद रेडेकर यांनी संघटनेत सर्व पत्रकारांना सोबत घेऊन एकसंघपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. सचिव विनोद ढोबळे यांनी संघाच्या कामकाजात पारदर्शकता ठेवून पत्रकारांसाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन व विविध उपक्रम राबवले जातील, असे स्पष्ट केले. तर कार्याध्यक्ष भीमराव गुरव यांनी संघ अधिक सक्रिय, सक्षम व प्रभावी करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली.या बैठकीत तालुक्यातील पत्रकारितेची गुणवत्ता वाढवणे, नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन करणे, सामाजिक प्रश्नांवर प्रभावी लेखन करणे, तसेच पत्रकारांच्या एकजुटीला बळकटी देणे, याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.या वेळी शरद तळेकर, रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी, सचिन रानडे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे आष्टी तालुका पत्रकार संघ अधिक सक्षम होऊन पत्रकारांच्या हितासाठी भक्कमपणे कार्य करेल, अशी भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली.

साप्ताहिक दिव्य वास्तव
सोमवार ५ जानेवारी ते रविवार ११ जानेवारी २०२६



# पै.सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ७२ रक्तदात्यांनी केले रक्तदान !

## हक्काच्या नेत्यासाठी हक्काने ७२ कार्यकर्त्यांचे तर नेत्यांनीही केले रक्तदान !





**पाटोदा / प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर नेत्यांनीही यामध्ये रक्तदान करून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले.

रक्तदान करून चालणार नाही ते गरजू पर्यंत पोहोचले पाहिजे आणि त्यासाठी हे रक्तदान आयोजित केले होते खऱ्या गरजूवंतांना रक्त योग्य वेळी मिळून त्यांचा जीव वाचला पाहिजे या हेतून दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित केला जातो याही वर्षी श्याम भाऊ माने मित्रपरिवार आष्टी तालुक्याच्या वतीने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये 72 रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर सतीश आबा शिंदे यांनी देखील कार्यकर्त्यांसोबत या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला स्वतः रक्तदान केले आणि रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे सांगून इतरांनाही वर्षातून एकदा तरी रक्तदान करा असे आव्हान केले. या शिबिरासाठी बीड जिल्हा राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अण्णासाहेब चौधरी, शिवाजीआबा डोके, उपमहाराष्ट्र केसरी अक्षय शिंदे, सुनील दादा नाथ, विजय अण्णा गाढवे, असलम शेख, महादेव डोके, शिवाजी शेकडे, सरपंच बाळासाहेब गर्जे, राहुल काकडे, भाऊ घुले, रिजवान शेख, पत्रकार सचिन पवार, दिगंबर पोकळे, अर्जुन आबा पवार, सुग्रीव पवार, सागर खेंगट, बाळासाहेब मोरे, इरफान शेख, देवा मुटकुळे, जालिंदर नाना गायकवाड, रमेश दादा भोगाडे, योगेश मुटकुळे, अमोल दरेकर, हनुमंत झगडे, बंडू पवार, अमोल थेटे, विठ्ठल चखाले, शाम माने, प्रवीण श्रीखंडे, शितू मुटकुळे, अनिल तावरे, गहीनाथ गाडे, चंदू सपकाळ, पंडित पोकळे, संतोष गोयकर, आबासाहेब तांबे, अशोक आवारे, शरद वाळेकर, सदाभाऊ बन, माहादेव घुले, बाबू शिंदे, निखिल नरोडे, कुमार धनवडे, अंगदबीचे विकी हंबर्डे यांच्यासह सर्व नेते मंडळी सहकार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते..

### रक्तदान श्रेष्ठ दान – पै .सतीश शिंदे

वाढदिवसानिमित्त दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केला जातो यामधून अनेक गरजूवंतांना योग्य वेळी रक्त मिळाल्याने त्यांचा जीवही वाचला आहे . रक्तदान हे अत्यंत महत्त्वाचे असून हे सर्वश्रेष्ठ दान असल्याने दरवर्षी हा उपक्रम घेतात त्याबद्दल सर्व माज्या मित्र परिवाराचे खूप खूप आभार भविष्यातही या ठिकाणी गरज भासेल त्या ठिकाणी रक्त भेटेल यासाठी सर्व टीम प्रयत्नशील असेल . . .

**– पै .सतीश आबा शिंदे, जिल्हा परिषद सदस्य तथा युवक जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड .**

# अबॅकस स्पर्धेत आरव नरसाळे राज्यात प्रथम !

## अभिनेता श्रेयश तळपदे यांच्या हस्ते सन्मान



**कुसळंब / प्रतिनिधी**

पिंपळवंडी ता. पाटोदा जि.बीड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पिंपळवंडी या शाळेचा इयत्ता दुसरीतील विद्यार्थी आरव नारायण नरसाळे याने पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत लेव्हल एकमध्ये रँक फर्स्ट पटकावला आहे. अवघ्या चार मिनिटांत ६८ गणिती उदाहरणे अचूकरीत्या सोडवत आरवने राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आरवचा सन्मान प्रसिद्ध अभिनेते श्रेयश तळपदे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. आरवच्या या यशामुळे पिंपळवंडी शाळेचे नाव राज्यपातळीवर उज्ज्वल झाले असून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.आरवच्या या यशामागे पिंपळवंडी शाळेचे » पान २ वर

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व आनंदनगरी मोठ्या उत्साहात साजरी



**पाटोदा / प्रतिनधी**

प्रियदर्शनी प्राथमिक शाळा या संस्थेचे सचिव डॉ .योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक मोरे सरांच्या नियोजनातून, पाटोदा येथे थोर समाजसुधारिका व स्त्रीशिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंतीनिमित्त बाल मेळावा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारा आनंदनगरी उपक्रम आज दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी (शनिवार) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी केंद्र प्रमुख श्री . ढेरे सर पाटोदा नगरपंचायत नगराध्यक्ष राजू भैया जाधव सभापती किशोर आडागळे नगरसेवक संतोष दादा जाधव माजी नगरसेवक संदीप दादा जाधव पत्रकार सचिन गायकवाड सर सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री एल आर जाधव सर श्रीधर स्वामी सानप प्राचार्य तांदळे सर प्राचार्य अविळे सर मुख्याध्यापक बोखारे सर मुख्याध्यापक खोले सर मुख्याध्यापक पठाण सर मुख्याध्यापक भोपळे मॅडमतसेच या शाळेचे मुख्याध्यापक पवन मोरे सर आजिनाथ नागरगोजे योगेश टेकाळे गोकुळ जिरेकर श्रीकांत लांडगे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित मुलांनी भाषणे सादर करून स्त्रीशिक्षणाचे महत्त्व व समाजसुधारणेचा संदेश दिला. यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर आधारित घोषवाक्यांनी संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आदर व सामाजिक जाणीव निर्माण झाली. यानिमित्ताने आयोजित आनंदनगरी उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला. शाळेच्या आवारात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक स्टॉल उभारण्यात आले. विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांचे स्टॉल मोठ्या उत्साहाने मांडले. पालकांनीही या उपक्रमास भेट देत विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक केले.आनंदनगरी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, संघभावना, नियोजन, आर्थिक व्यवहाराची ओळख व आत्मविश्वास वाढण्यास मोलाची मदत झाली. शिक्षकांनी वेळोवेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेलार मॅडम यांनी केले या वेळी विर मॅडम गायके मॅडम तसेच शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले शेवटी आभार प्रदर्शन माताडे सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष अजय जोशी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना मराठी पत्रकार परिषद सदस्य सचिन पवार, सोमनाथ खंडागळे, जावेद शेख, दिगंबर नाईकवरे, पवनकुमार भाकरे, सचिन शिंदे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते . .


# प्रहार शेतकरी संघटनेला नवे नेतृत्व तालूकाध्यक्ष मनोज खिंडरे, शहरध्यक्ष सोमनाथ वाघयारे यांची निवड

**किल्ले धारूर / प्रतिनीधी**

प्रहार शेतकरी संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी श्री. मनोज अनंतराव खिंडरे व शहरध्यक्ष सोमनाथ वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शेतकरी हितासाठी सातत्याने कार्यरत असलेले, तळागाळातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणारे आणि संघटन कौशल्याने ओळखले जाणारे मनोज खिंडरे व सोमनाथ वाघमारे यांच्यावर प्रहार जनशक्ती पक्षाने दाखवलेला विश्वास ही बाब निश्चितच गौरवास्पद आहे.

त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या





प्रश्नांना अधिक प्रभावी न्याय मिळेल, तसेच प्रहार जनशक्ती पक्ष,प्रहार दिव्यांग क्रांती,प्रहार शेतकरी संघटनेचे कार्य अधिक जोमाने पुढे जाईल,अशी आशा शेतकरी वगार्तून व्यक्त होत आहे. » पान २ वर

# राहुल डोंगर सर आदर्श शिक्षक पुरस्काराने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते सन्मानित



**अंमळनेर / प्रतिनिधी**

जिल्हा परिषद बीड आदर्श शिक्षक पुरस्कार सन –2025 श्री राहुल नामदेव डोंगर सर –सहशिक्षक जि.प.प्रा.शा.जरेवाडी ता पाटोदा जि. बीड विद्यमान जि. प.प्रा. शा. कोतन ता. पाटोदा यांना उत्कृष्ट तंत्रस्नेही व विविध शैक्षणिक उपक्रम,गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्य, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, पी एम श्री शाळा यासाठी विशेष कार्य,पटसंख्या वाढ, लोकसहभाग, सांस्कृतिक उपक्रम, शालेय बचत बँक, शैक्षणिक अभ्यास दौरे, क्रफ्ड ठअरअ विद्यार्थी निवड,ऑनलाईन टेस्ट, विविध शैक्षणिक उपक्रम सातत्याने विविध स्पर्धा परीक्षेमध्ये विशेष कार्य करत जिल्हा गुणवत्ता यादीत शाळेतील सर्वाधिक विद्यार्थी याकरिता जाहीर झाला असून एकूण आजपर्यंत प्रा शा आंबेवाडी जरेवाडी व कोतन येथील सरांचे कार्य उत्कृष्ट असल्याने व पुरस्कार प्राप्त झाल्याने सरांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख मुख्याध्यापक, सर्व शिक्षक शिक्षिका,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य, सरपंच उपसरपंच सदस्य, लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव व सर्व संचालक या सर्वांनी खूप खूप अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या सर्व स्तरातून सरांचे कौतुक होत आहे व नववर्ष निमित्ताने दि 1 जानेवारी 2026 जिल्हा परिषद बीड आदर्श शिक्षक पुरस्कार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड मा.ना. श्री अजित (दादा )पवार साहेब , मा. श्री बजरंग सोनवणे खासदार बीड मा. श्री सुरेश आण्णा धस विधानसभा सदस्य आष्टी पाटोदा शिरूर , मा. श्री प्रकाश सोळंके, मा. श्री विजयसिंह पंडित » पान २ वर

# आष्टी तालुका पत्रकार संघाची कार्यकारणी जाहीर



### अध्यक्षपदी संतोष सानप तर सचिवपदी विनोद ढोबळे यांचे बिनविरोध निवड

**आष्टी / प्रतिनिधी**

आष्टी तालुका पत्रकार संघाची सर्वसाधारण बैठक आज दर्पण दिनी उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीत संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली. या बैठकीत अध्यक्षपदी संतोष सानप, उपाध्यक्षपदी मनोज पोकळे व शरद रेडेकर, सचिवपदी विनोद ढोबळे, तर कार्याध्यक्षपदी भीमराव गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित पत्रकार बांधवांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. ही निवड प्रक्रिया ज्येष्ठ पत्रकार प्रफुल सहस्त्रबुद्धे, उत्तमराव बोडखे, दत्ता काकडे, सिताराम पोकळे तसेच मावळते अध्यक्ष प्रवीण पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी संघाच्या वाटचालीचा आढावा घेत पुढील दिशा व धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष सानप यांनी सांगितले की, तालुक्यातील पत्रकारांच्या समस्या, अडचणी, हक्क व सुरक्षिततेसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून ठामपणे आवाज उठवला जाईल. पत्रकारितेतील नीतिमूल्ये जपून सामाजिक बांधिलकीची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी संघ सातत्याने कार्यरत राहील.लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची » पान २ वर

# येडेश्वरी फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी व्यवसाय उभारणीस बळ

## लव्हुरीत राजवीर एंटरप्राईजेसचे उद्घाटन



**केज / प्रतिनिधी**

खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली येडेश्वरी फाउंडेशन, केज यांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम प्रभावी ठरत असून, शेकडो महिला आज स्वतःचा व्यवसाय उभा करत आहेत. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण व्हावे, त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्यात, या उद्दिष्टाने येडेश्वरी फाउंडेशनतर्फे महिला सक्षमीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या येडेश्वरी फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना शिवणकाम, अरीवर्क कला, बेकरी प्रॉडक्ट्स, कॉम्प्युटर कोर्स आदी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे.येडेश्वरी कार्यालयात सुरू असलेल्या या प्रशिक्षणातून महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून स्वतःचे व्यवसाय सुरू केले असून, अनेक कुटुंबांना याचा थेट लाभ होत आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ३ जानेवारी रोजी येडेश्वरी फाउंडेशनच्या सौजन्याने लव्हुरी येथे रूपालीताई शिनगारे यांच्या राजवीर एंटरप्राईजेस व जनरल स्टोअर्स या व्यवसायाचे उद्घाटन येडेश्वरी फाउंडेशनच्या शितल लांडगे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश काशिनाथ पाटेकर यांनी केले तर प्रस्तावना सरस्वती शिनगारे यांनी मांडली. प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच विजयदादा चाळक, भाईदादा चाळक, छत्रभुज चाळक, दीपिका पाटेकर यांच्यासह गावातील मान्यवर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.येडेश्वरी फाउंडेशनच्या सहकार्याने गोरगरीब महिलांचे व्यवसाय उभे राहत असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महिलांच्या स्वावलंबनासाठी राबविण्यात येणारे हे प्रयत्न प्रेरणादायी ठरत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# जीवनामध्ये ध्येय साध्य करत असताना कठोर श्रमाला पर्याय नाही- गोवर्धन जाधव

**पाटोदा / विशेष प्रतिनिधी**

माणसाला जीवनामध्ये कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात कठोर परिश्रमाला पर्याय नाही आणि यशाला कोणताही जवळचा मार्ग नसतो असे प्रतिपादन गोवर्धन विठ्ठलराव जाधव पत्रकार तथा एलआयसी ऑफ इंडिया चे चेअरमन, गॅलक्सी क्लब सदस्य यांनी पाटोदा तालुक्यातील जानपिर विद्यालय नाळवंडी येथे गरजू मुलांना ड्रेस व शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात बोलताना केले.

अंमळनेर गावचे सुपुत्र रामनाथ लक्ष्मणराव पोकळे विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती यांच्या वाढदिवसानिमित्त सालाबाद प्रमाणे याही वर्षी गोवर्धन जाधव यांच्या वतीने जानपिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नाळवंडी या शाळेतील गरीब व गरजू मुलांना शालेय गणवेश व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना जाधव म्हणाले की, ज्याप्रमाणे समुद्र सर्वांसाठी सारखाच असतो मात्र काही जण त्या समुद्राच्या भोवती फिरून पाय ओले करून येतात तर काहीजण त्या समुद्राच्या पाण्यामध्ये डुबकी मारून मोती मिळवतात त्याचप्रमाणे शिक्षणाच्या विशाल सागरामध्ये स्वतःला झोकून देऊन शिक्षण घेतले तर त्या विद्यार्थ्यांची प्रगती कोणीही रोखू शकत नाही औपचारिकता म्हणून शिक्षण न घेता आपल्याला आपले करिअर घडवायचे आहे हे समजून मनापासून शिक्षण घेतल्यास त्या विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ स्वतःसाठी कुटुंबासाठी आणि समाजासाठी सुद्धा आनंददायी ठरतो कठोर



परिश्रमाशिवाय या जगात कोणतीही गोष्ट मिळत नाही आणि कठोर परिश्रम कधीही वाया जात नाहीत जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर प्रत्येकाने जिद्द प्रचंड मेहनत आणि चिकाटी या त्री सूत्रीचा अवलंब केला पाहिजे काही काळ मागे पाहिले तर टीव्ही आणि आता मोबाईल या गोष्टी माणसाच्या आयुष्यातील काल हरण करणाऱ्या आहेत शैक्षणिक काळातला वेळ म्हणजे अतिशय महत्त्वाचा वेळ आणि बऱ्याच विद्यार्थ्यांचा तोच वेळ मोबाईल मध्ये जाताना दिसत आहे. विद्यार्थी दशेमधला अनमोल असा वेळ वाया घालवणाऱ्या या गोष्टीपासून विद्यार्थ्यांनी दूर राहणे गरजेचे आहे. प्रत्येक पालकांनी आणि शिक्षकांनी आपल्या पाल्यांना मोबाईल पासून दूर ठेवणे गरजेचे आहे. असेही ते म्हणाले जानपिर विद्यालयाचे संस्थापक जे.एल. पठाण गुरुजी यांच्या मातोश्री स्वर्गीय फुंदावी पठाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त या विद्यालयांमध्ये पारनेर येथील प्रसिद्ध व्याख्याते डॉक्टर सय्यद रफिक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. सय्यद रफीक यांनी आपल्या व्याख्यानातून बंधू भाव सामाजिक सलोखा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात त्यांनी सांगितले की, कोणताही धर्म एक दुसऱ्याचा द्वेष शिकवत नाही. धर्म जरी अनेक असले तरी ईश्वर आणि ईश्वरी तत्व हे एकच आहे. मानवाला निर्मित करताना त्या विधात्याने भेदभाव केला नाही, तर आपण माणसे भेदभाव का करतो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन मोठे होत असताना पहिल्यांदा माणूस व्हावे माणसाला माणूस घडवणारे शिक्षण तेच खरे शिक्षण होय, आज शिक्षण संस्था उदंड झाल्या आहेत, परंतु माणूस घडवणाऱ्या संस्था निर्माण होणे गरजेचे आहे. असेही ते म्हणाले. या कार्यक्रमासाठी चॉद मौलाना, अंमळनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नि. भार्गव सपकाळ पी.एस.आय. कृष्णा चव्हाण मा. सरपंच सय्यद इकबाल पत्रकार भाऊसाहेब पवार, बबनराव उकांडे. मा. सरपंच भगवान अण्णा काकडे, छावा संघटनेचे आर.आर. येवले, सरपंच डॉ. एकबाल पठाण प्रा. कदिराबानो पठाण यांच्यासह परिसरातील प्रतिष्ठित नागरिक शेतकरी विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# पै.सतीश शिंदे यांच्या वाढदिवसाला निस्वार्थी प्रेम करणाऱ्या युवकांची तुफान गर्दी!

## विविध कार्यक्रमातून वाढदिवस साजरा ; धार्मिक स्थळांवर जाऊन घेतले दर्शन !







### कार्यकर्त्यांचे प्रेम हे हक्काचं प्रेम

राजकारण करत असताना कार्यकर्त्यांकडून मिळणार प्रेम हे हक्काचं असतं परंतु त्यांचाही तेवढाच हक्क आपल्यावर असतो हे मी जाणून होतो त्यांचं माज्यावर आणि माझं कार्यकर्त्यांवर प्रेम असल्याने कधीही आम्ही सुखदु :खात सोबत असतो भविष्यातही राहू.. मी त्यांच्याकडे कार्यकर्ता म्हणून नाही तर घरातील सदस्य म्हणून पाहतो म्हणून ते माज्यावर प्रेम करतात आणि मी त्यांच्यावर प्रेम करतो..

– पै .सतीश आबा शिंदे जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी बीड .

पाटोदा / प्रतिनिधी

**राजकीय नेता म्हटलं की तिथं काही ना काही स्वार्थ येतोच पण निस्वार्थी प्रेम करणारे कार्यकर्ते युवक आणि नेते तुरळक पाहायला मिळतात त्यातीलच एक म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश शिंदे हे आहेत त्यांच्यावर हजारो युवक निस्वार्थी प्रेम करतात आणि कोणताही कार्यक्रम असो तितकेच युवकांची गर्दी आपल्याला पाहायला मिळते वाढदिवसानिमित्त झालेली तुफान गर्दी ही त्यांच्यावर निस्वार्थी प्रेम असल्याचं प्रतीक आहे .**

पै.सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त चार जानेवारी रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन आष्टी येथे करण्यात आले होते तर विविध धार्मिक स्थळांना भेटी देऊन दर्शन घेऊन त्यांनी नवीन वर्षाची सुरुवात केली. हजारो युवकांनी निस्वार्थी प्रेमाचं प्रतीक म्हणून सतीश आबा शिंदे यांना आपलंसं केलं आहे तेच हजारो कार्यकर्ते युवक नेहमी कोणत्याही कार्यक्रमाला उपस्थित असतात आजही त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती राहून रक्तदान शिबिर सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमाला उपस्थिती लावून वाढदिवस मोठ्या थाटात साजरा केला हे निस्वार्थी प्रेमाचं प्रतीक सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पहायला मिळालं.. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हा राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अण्णासाहेब चौधरी, शिवाजीआबा डोके, उपमहाराष्ट्र केसरी अक्षय शिंदे, सुनील दादा नाथ, विजय अण्णा



गाढवे, असलम शेख, महादेव डोके, शिवाजी शेकडे, सरपंच बाळासाहेब गर्जे, राहुल काकडे, भाऊ घुले, रिजवान शेख, पत्रकार सचिन पवार, दिगंबर पोकळे, अर्जुन आबा पवार, सुग्रीव पवार, सागर खेंगट, बाळासाहेब मोरे, इरफान शेख, देवा मुटकुळे, जालिंदर नाना गायकवाड, रमेश दादा भोगाडे, योगेश मुटकुळे, अमोल दरेकर, हनुमंत झगडे, बंडू पवार, अमोल थेटे, विठ्ठल चखाले, शाम माने, प्रवीण श्रीखंडे, शितू मुटकुळे, अनिल तावरे, गहीनाथ गाडे, चंदू सपकाळ, पंडित पोकळे, संतोष गोयकर, आबासाहेब तांबे, अशोक आवारे, शरद वाळेकर, सदाभाऊ बन, माहादेव घुले, बाबू शिंदे, निखिल नरोडे, कुमार धनवडे, अंगदबीचे विकी हंबर्डे यांच्यासह सर्व नेते मंडळी सहकार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते..

### 72 रक्तदात्यांचे रक्तदान ; सांस्कृतिक कार्यक्रम

पै . सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावर्षी 72 रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तसेच इतरांनाही रक्तदान करण्याची आव्हान केले ज्यावेळेस रक्ताची गरज भासेल तेव्हा सतीश आबा शिंदे यांच्या कार्यकर्त्यांना फोन करा आपली अडचण दूर केली जाईल असेही शेवटी आवाहन केले...

# निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रस्त्यांची डागडुजी !





### भावी जिल्हा परिषद सदस्यांचा संधीसाधूपणा उघड

### डांबर न वापरता रस्ताकाम ; ग्रामस्थांनी काम पाडले बंद – डॉ . गणेश ढवळे

बीड / प्रतिनिधी

ग्रामीण भागातील खड्डेमय रस्त्यांमुळे दुचाकीस्वार घसरून पडून अपघात होत असताना, नागरिकांचे जीव जात असताना आणि पावसाळ्यात शालेय विद्यार्थ्यांना चिखलातून वाट काढावी लागत असताना ग्रामस्थांनी दिलेली निवेदने, लेखी तक्रारी व आंदोलने संबंधित भावी जिल्हा परिषद सदस्यांनी सातत्याने दुर्लक्षित केली होती. मात्र आता जिल्हा परिषद निवडणूक जवळ येताच अचानक रस्त्यांची तात्पुरती डागडुजी सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

काही ठिकाणी खड्ड्यांवर माती टाकणे, खडी पसरवणे, नाममात्र डांबरीकरण करणे तर काही ठिकाणी स्वखर्चाने रस्ता केला असे गाजावाजा करत फोटो-व्हिडीओ सोशल मीडिया व स्थानिक वृत्तपत्रांत झळकू लागले आहेत. मात्र हा खरा विकास नसून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेली दिखाऊ मलमपट्टी असल्याचा घणाघाती आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. निवडणूक नसती तर हे रस्ते तसेच खड्डेमय राहिले असते. अपघातात माणसं गेली, अनेकजण जखमी झाले, तरी कुणालाही जाग आली नाही. आता मतांसाठी अचानक प्रेम उफाळून आले पान २ वर

### महाजनवाडी ग्रामस्थांनी निकृष्ट रस्ताकाम अडवले

बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग मांजरसुंभाझपाटोदाझमहाजनवाडीझबोरखेड या रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू असून सुमारे १० लाख रुपये खर्चाचे अंदाजे ८०० मीटर खडी-डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला .

# मॉंसाहेब जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याची जोरदार तयारी

## मनोज जरांगे पाटील यांना बीडच्या जिजाऊ जन्मोत्सवाचे निमंत्रण

बीड / प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मॉंसाहेब जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहांमध्ये बीड येथे साजरा होत आहे यावर्षीही तुम्ही आम्ही बिडकर आयोजित मॉंसाहेब जिजाऊ महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होणार असून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. विशेष करून या कार्यक्रमाला संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती असणार आहे.

तुम्ही आम्ही बिडकर आयोजित मॉंसाहेब जिजाऊ जन्मोत्सव सोहळा 12 जानेवारी रोजी मोठ्या थाटात संपन्न होणार असून मॉंसाहेब जिजाऊ जन्मोत्सवच्या पूर्वसंध्येला 11 जानेवारी रोजी संध्याकाळी शहरातील



महिलांच्या उपस्थितीत मध्ये दीपोत्सव साजरा होणार आहे. तसेच 12 जानेवारी रोजी सकाळी ठीक 9 वाजता मॉंसाहेब जिजाऊ पूजन जिजाऊ वंदना व लगेचच लेझीम पथक, लाठी काठी प्रात्यक्षिक विविध आरोग्य विषयी कॅम्प, रक्तदान शिबिर व आलेल्या सर्व नागरिकांसाठी अल्पोपहार ठेवण्यात आला असून विविध सामाजिक उपक्रमाने यावर्षी मॉंसाहेब जिजाऊ जन्मोत्सव साजरा होत आहे. कार्यक्रमासाठी आलेल्या महिलांना फेटा बांधून सन्मानित करण्यात येणार असून जिल्ह्यातील ज्या मुलींनी विविध क्रीडा क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण कामगिरी केली आहे, अशा मुलींच्या हस्ते ध्वजारोहण व मॉंसाहेब जिजाऊ पूजन होणार आहे, तरी बीड शहरातील सर्व जाती धमार्तील नागरिकांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान तुम्ही आम्ही बिडकर आयोजकांकडून करण्यात आले आहे..

### मनोज जरांगे पाटलांना मॉंसाहेब जिजाऊ जन्मोत्सवाचे निमंत्रण

तुम्ही आम्ही बिडकर आयोजित 12 जानेवारी रोजी मॉंसाहेब जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहात बीड येथे साजरा होत आहे . जिजाऊ जन्मोत्सवासाठी मनोज जरांगे पाटील यांना विशेष निमंत्रित केले असून विविध सामाजिक उपक्रमाने हा जन्मोत्सव साजरा होत आहे, त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या उत्सवामध्ये सहभागी होण्याचे आव्हान तुम्ही आम्ही बिडकरच्या वतीने करण्यात आले आहे .



मराठी पत्रकार परिषद पाटोदा तालुक्याच्या वतीने पत्रकार दिन दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून मोठ्या उत्साहात साजरा..

# भरदिवसा दुचाकीची चोरी

अंबाजोगाई / प्रतिनिधी

तालुक्यातील तळणी शिवारात एका शेतातील राहत्या घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवून नेल्याची घटना दि.२ जानेवारी रोजी भरदिवसा दुपारी तीन वाजता घडली. याप्रकरणी बदार्पूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळणी येथील रहवाशी शरद बाळासाहेब गित्ते (वय २१) यांनी आपली दुचाकी (क्र.एम.एच ४४ ए.सी.२१८९) अंबाजोगाई ते अहमदपूर रोडवरील पूस शिवारात असलेल्या आपल्या मित्राच्या शेतातील राहत्या घरासमोर उभी केली होती.काही वेळातच दुपारी तीन वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने संधी साधून ही काळ्या रंगाची होंडा शाईन कंपनीची दुचाकी चोरून नेली. चोरीला गेलेल्या या दुचाकीची किंमत अंदाजे ५५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. या प्रकरणी शरद गित्ते यांच्या फियार्दीवरुन अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस हवालदार भाजीभाकरे हे करत आहेत.

## भाऊसाहेब भवर यांची किंमत कमी नाही तर आजुन वाढली ; कितीही खोट्या पोष्ट करा यंदा भाऊसाहेब भवर यांनाच संधी – सरपंच तात्यासाहेब लाड

# भाऊसाहेब भवर यांची चांगली धास्ती घेतली वाटतं ; फेक अकाउंट वरून बदनामीच षडयंत्र !

कुसळंब / प्रतिनिधी

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका लवकरच होणार असुन ईच्छुक उमेदवाराला फेक अकाउंट ओपन करुन फेसबुकवर बदनाम करण्याचा प्रकार अंमळनेर सर्कल मधील जिल्हा परिषद गटाचे आ. सुरेश धस यांचे शिलेदार भाऊसाहेब आण्णा भवर यांच्या बाबतीत घडला असुन सामाजीक, धार्मिक, आणि लोकांच्या सुखःदुखात कायम राहणाऱ्या भाऊसाहेब भवर यांना बदनाम करण्याचा डाव आखण्यात आला आहे, परंतु याचा परिणाम उलटा झाला असुन भाऊसाहेब भवर यांची लोकप्रियता वाढल्याचे दिसुन आले. फेक आकाउंटवरुन फेसबुक पोष्ट करणाऱ्यांच्या विरोधात कायार्वाही करण्यासाठी मोठा जमाव अंमळनेर पोलीस ठाण्यावर धडकुन या विरूद्ध कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

भाऊसाहेब भवर हे गेल्या अनेक वषार्पासून आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली जनतेची कामे करीत आले आहेत. सर्कलमधील श्रीक्षेत्र गहिनिनाथगड, भगवानभक्तिगड, अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी, यासह विविध धार्मिकठिकाणी सढळ हाताने अन्नदान करण्यासाठी पुढे सरसावतात, अनेकांकडे पैसा असतो पण मदत करण्याची माणसीकता पण असावी लागते आणि ती फक्त भाऊसाहेब आण्णा भवर यांच्यामध्ये दिसून येते, एवढच काय गोरगरीब नडला तर त्याला दवाखान्यासाठी, शिक्षणासाठी मदत करतात आणि या कायालार्देखील फेक अकाऊंटद्वारे विरोध होत असेल तर ते जनतेला पटणारे नाही आणि त्यामुळेच बदनामी करणारा तोंडघशी पडला असुन भाऊसाहेब भवर यांची बदनामी नाही तर लोकप्रियता वाढली आहे. आता थांबायचे नाही यंदा भाऊसाहेब भवर यांनाच जिल्हा परिषद सदस्यासाठी संधी द्यायची अशी प्रतिक्रिया



भाऊसाहेब आण्णा भवर यांच्याविषयी बदनामीकारक फेसबुक पोष्ट करणाऱ्या फेक अकाउंटचा शोध घेऊन कार्यवाही करण्यासाठी अंमळनेर सर्कलमधील असंख्य ग्रामस्थ अंमळनेर पोलीस ठाण्यावर धडकले .

चिखलीचे सरपंच तात्यासाहेब लाड यांनी व्यक्त केली. गहिनिनाथ गडाला दिलेल्या पंगतीला बनवलेल्या व्हिडीओवर फेक अकाऊंटवरुन बदनामीकारक कमेंट करण्यात आली आहे. भाऊसाहेब भवर यांचे अनेक व्यवसाय आहेत अनेक व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी परिश्रमातुन कमावलेल्या पैशातुन धर्म कायार्ला मदत करतात परंतु चुकीच्या आणि बदनामी होईल अशी पोष्ट करुन भाऊसाहेब भवर यांची बदनामी करण्याचा प्रयन्त हा केवीलवाना ठरत आहे. विरोध जरुर करा पण समोरासमोर करा पाठीत खंजीर खुपसु नका, फेक अकाउंटवरुन बायकी काम करु नका असा सल्ला भाऊसाहेब भवर यांना दिला असुन समोरा समोर लढा जनतेच्या दारात न्याय घेऊ असे अवाहन देखील भवर यांनी केले आहे.

### अशांतता माजेल असे कृत्य कोणी करु नये

निवडणुकीचा काळ असुन या कालावधीत बदनामीकारक पोष्ट करणाऱ्यावर पोलीसांची बारकाईने नजर असुन वातावरणात अशांतता माजेल असे कृत्य कोणी करु नये . आणी भाऊ साहेब भवर यांच्या विरुध्द बदनामीकारक कमेंट केलेल्या फेक अकाउंटचा शोध घेऊन लवकरच कार्यवाही करणार . – **भार्गव सपकाळ स . पो . नि . पोलीस ठाणे, अंमळनेर .**

### हिम्मत असेल तर समोरासमोर असे बायकी काम करु नये : भवर

गेल्या अनेक वषार्पासुन जनतेच्या सेवेत आहे . माझी लोकप्रियता वाढत असल्याने विरोधकांच्या पोटात पोटसुळ उठला आहे . त्यामुळे फेक अकाउंट ओपन करुन फेसबुकच्या माध्यमातुन बदनामी करुन बायकी काम करीत आहेत . हिंमत असेल तर समोरासमोर लढुत आणि जनतेच्या न्यायलयात न्याय घेऊ पण अशी बायकी काम करु नये असे अवाहन भाऊ साहेब आण्णा भवर यांनी केले आहे .

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक सचिन मनोहर पवार, यांनी मिनाक्षी प्रिंट्रस, कुसळंब ता.पाटोदा जि.बीड – ४१३२०७ येथे छापून साप्ताहिक दिव्यवास्तव कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज चौक कुसळंब, ता.पाटोदा जि.बीड – ४१३२०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे.संपादक सचिन मनोहर पवार मो.९९२१८०१९१९, Email.divyavastav19gmail.com

THIS NEWSPAPERS IS PRINTED,PUBLISHER,OWNED BY SACHIN MANOHAR PAWAR, AT Meenakshi PRINTERS ,KUSLAMB TQ.PATODA DIST.BEED AND PUBLISHED AT THE OFFICE WEEKLY DIVYA VASTAV, CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ CHOWK KUSLAMB, TQ.PATODA DIST.BEED - 413207(MAHARSTHRA).Mob.9921801919, Email.divyavastav19gmail.com